मा. सर्वोच्च न्यायालय विशेष अनुमती याचिका(सी)
६०३९-६०४१/२०१६ मधील सिव्हील अपिल क्र.
६५३१-६५३३/२०२२ मध्ये दि.०७/०९/२०२२ अन्वये
पारित आदेशाचे अंमलबजावणी करणेबाबत..
रोजगार हमी योजनेअंतर्गत समावेशन झालेल्या
तत्का. हजेरी सहाय्यकांच्या सेवेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/५३६/२०२५
अहिल्यानगर दि. ०६/११/२०२५

संदर्भ :- १. मा.जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.रोहयो/कार्या/१८(६)/४०/२००४
दि.२४/६/२००४
२. नियोजन विभाग (रोहयो विभाग) शासन निर्णय क्र.हसका-२०२३/प्रक्र१३/मग्रारो-३ दि.२३ मे २०२३
३. नियोजन विभाग (रोहयो विभाग) यांचेकडील पत्र क्र. न्यायाप्र २०२५/प्र. क्र. ९४/मग्रारो-३
दि. १२/०८/२०२५

रोजगार हमी योजनेअंतर्गत हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत, त्यांच्या सेवा व वेतनासंदर्भात नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्या स्तरावरुन वेळोवेळीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये रोजगार हमी योजनेअंतर्गत समावेश झालेल्या हजेरी सहाय्यकांना जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिनस्त परिचर पदावर सामावून घेण्यात आलेले होते.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयात नमुद शासन निर्णयास अनुलक्षुन शासन सेवेत समावेश झालेल्या हजेरी सहाय्यकांची तसेच मा. न्यायाधिकरण/न्यायालये यांनी दिलेल्या निर्देशानुसार समावेशन झालेल्या हजेरी सहाय्यकांची मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०७/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशांस अनुसरुन दि. ३१/०३/१९९७ पासुनची सेवा निवृत्तीवेतनार्ह सेवा म्हणून ग्राहय धरण्यात यावी. रोजगार हमी योजनेअंतर्गत हजेरी सहाय्यकांचे समावेशन ज्या शासकीय कार्यालयात करण्यातआलेले आहे, त्या कार्यालय प्रमुखांनी/विभागप्रमुखांनी/प्रशासकीय विभागाने उपरोक्त निर्णयानुसार समावेशन झालेल्या हजेरी सहाय्यकांची सेवा विषयक अभिलेखांची तपासणी करुन त्यानुसार दि. ३१/०३/१९९७ पासुन निवृत्तीवेतन देणेबाबत कार्यवाही करावी. सदरचे लाभ हे काल्पनिकरित्या ग्राहय धरण्यात येत असल्याने, कोणत्याही कर्मचा-यांना दि. ३१/०३/१९९७ ते प्रत्यक्ष समावेश या कालावधीतील कोणतेही सेवाविषयक लाभ वा वेतन फरक/थकबाकी रक्कम अनुज्ञेय नाही. तसेच पुनर्वेतन निश्चिती करण्यात येऊ नये अशी तरतुद विषद करणेत आलेली आहे. तसेच दि. ३१/०७/१९९७ पासून निवृत्तीवेतनार्ह सेवा ग्राह्य धरल्यास सेवानिवृत्ती वेतनात कोणताही बदल होणार नाही, कारण दि. ०१/०१/२००६ पासून सेवानिवृत्तीवेतन हे शेवटच्या १० महिन्यातील वेतनाची सरासरी अथवा शेवटचे मुळ वेतनाच्या निम्मे इतके परिगणीत करण्यात येते. सबब, सेवाकालावधी वाढल्याचा परिणाम सेवानिवृत्तीवेतनावर होत नाही. मात्र, सेवानिवृत्ती उपदानाची परिगणना करताना सेवाकालावधी वाढल्याने त्यात वाढ होते. सदर वाढीव उपदानाच्या फरकाची रक्कम हजेरी सहाय्यक यांना देणे क्रमप्राप्त आहे.

त्यानुसार जिल्हा परिषद अधिनस्त खालीलप्रमाणे नमुद परिचर या संवर्गात समावेशन झालेले एकुण २ हजेरी सहाय्यक यांची सेवा रकाना क्रमांक ७ मध्ये नमुद केलेनुसार दि. ३१/०३/१९९७ पासुन सेवानिवृत्ती करीता ग्राह्य धरण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | कार्यालयाचे नाव | जिल्हा परिषद सेवेत हजर झाल्याचा दिनांक | सेवा निवृत्ती दिनांक | निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. प्रकाश गुलाबराव गोसावी | प्रा.आ.कें सावळी विहीर, ता. राहाता | ०१/१२/१९९८ | ३१/०५/२०१४ | ३१/०३/१९९७ |
| २ | श्री. चांगदेव एकनाथ धरम | प्रा.आ.कें वाकडी, ता. राहाता | ०९/१२/२००४ | ३१/१२/२००९ | ३१/०३/१९९७ |

तरी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेत येऊन आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्र. 202511060401८७ असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
संबंधित कर्मचारी.........................................
व्दारा व प्रत :-कार्यालय प्रमुख ............................(संबंधित)

२/-सदर आदेशानुसार संबंधित कर्मचारी यांच्या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणेत यावी, तसेच संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ मध्ये नमुद केलेनुसार शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मध्ये संबंधित कर्मचारी यांची माहिती तात्काळ सादर करावी.

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.
प्रत: मुळ नस्ती

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर